महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २७

# महाराजा सयाजीराव आणि संस्कृत भाषा संवर्धन

## निलोफर मुजावर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २७

# महाराजा सयाजीराव आणि संस्कृत भाषा संवर्धन

निलोफर मुजावर

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
संस्कृत भाषा संवर्धन
इतिहास
निलोफर मुजावर
●
प्रकाशन क्रमांक - ४७
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : निलोफर मुजावर
टी. के. आय. ई. टी स्टाफ निवास
कॉलेज रोड, वारणानगर ता. पन्हाळा,
जि. कोल्हापूर पिन कोड – १६११३
मो.८९५६५८१६०९
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २६ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# संस्कृत भाषा संवर्धन

महाराजा सयाजीराव हे मानवी संस्कृतीचा परिपूर्ण आणि ज्ञानमार्गी विचार करणारे राज्यकर्ते होते. धर्म, भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचा कोणत्याही भेदभाव आणि दुराग्रहाशिवाय विचार करणारे खरे प्रज्ञावंत होते. जगातील सर्व संस्कृती मानवजातीसाठी ज्ञानाचा झरा आहे ही डोळस श्रद्धा ते जगत आले. त्यामुळे भारतीय असूनही धर्म आणि जातमुक्त निखळ मानवतावादी युगपुरुष म्हणून त्यांचा विचार करावा लागेल. धर्म आणि जात यांच्या जोरखंडातून मुक्त करताना त्यांना स्वत: तुलनात्मक विचारशक्तीचे पाईक बनविले. परिणामी संस्कृती धर्म, जात यांच्या पोकळ अभिमानावर ते मात करू शकले. भारतीय समाज आणि संस्कृतीचा इतिहास समजून घ्यायचा असेल तर संस्कृत भाषा आत्मसात करण्याशिवाय पर्याय नाही हे त्यांनी जाणले. त्यामुळेच राज्यकारभार हाती आल्यापासूनच संस्कृत ग्रंथांचे मराठी, गुजराती भाषंतर, हिंदू धर्मातील सर्व जातींना मोफत संस्कृत शिक्षण देणे, प्राच्यविद्या संस्थेच्या

माध्यमातून प्राचीन संस्कृत ग्रंथांचे संवर्धन आणि पुनर्प्रकाशन करणे इतक्या व्यापक स्वरुपात त्यांनी संस्कृत भाषेचे संवर्धन केले. राज्यकारभार हाती घेतल्यानंतरच्या पहिल्या दशकात ते रियासतकार सरदेसाईकडून दोन ते तीन वर्षे संस्कृत शिकले. त्यांच्या या सर्व प्रयत्नामागे संस्कृत भाषेतील ज्ञानभांडार जे ब्राह्मण जातीपुरते मर्यादित होते ते सर्वांसाठी खुले करण्याचा विशाल दृष्टीकोनसुद्धा होता.

या पार्श्वभूमीवर बडोद्यात मार्च १९१५ रोजी भरलेल्या पहिल्या संस्कृत संमेलनात महाराजांनी केलेले भाषण त्यांचा दृष्टीकोन स्पष्ट करते. या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात महाराज म्हणतात, “संस्कृत भाषा ही प्रौढ भाषा असून ती इतर अनेक भाषांची जननी आहे.” याच भाषणात पुढे महाराज म्हणतात, “परंतु संस्कृत वाङ्मयाचे मूलस्थान जो हिंदुस्थान देश त्या देशातील लोकांकडून म्हणजे आम्हा हिंदू लोकांकडून संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास वर दर्शविलेल्या दिशेने झाला किंवा होत आहे असे मला वाटत नाही. आपल्या लोकांनी या वाङ्मयाकडे जरी दुर्लक्ष केले नसले तरी त्या संबंधी योग्य ते श्रम आपण घेतले नाहीत असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते.” महाराजांची ही भूमिका संस्कृत भाषेला आपल्या प्राचीन संस्कृतीला समजून घेण्याचे एक साधन मानते. १०६ वर्षापूर्वी सयाजीरावांनी संस्कृत भाषेबाबत स्वीकारलेला दृष्टीकोण आजही आपल्याला पुनर्विचार करायला लावणारा आहे.

## धर्म साक्षरतेचा आरंभ आणि संस्कृत भाषा

१८८१ मध्ये राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतर महाराजा सयाजीराव यांच्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणांच्या कार्यक्रमास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. १८८४ मध्ये सत्यशोधकी विचाराचे रामचंद्र विठोबा धामणस्कर यांना ब्रिटिश सरकारच्या नोकरीतून बोलावून सयाजीरावांनी बडोद्यात नायब सुभे पदावर नेमले आणि इथूनच बडोद्यातील सत्यशोधकी विचारांना चालना मिळाली. त्यानंतर रामजी संतूजी आवटे या आणखी एका सत्यशोधकी विचारांच्या व्यक्तीने ‘बडोदा वत्सल’ हे सत्यशोधकी वर्तमानपत्र काढले.

सत्यशोधकांनी हिंदू धर्म चिकित्सेच्या भूमिकेतून संस्कृत भाषेतील धर्म विधींसंदर्भातील साहित्य मराठीत भाषांतरित करण्याचे प्रयत्न महात्मा फुलेंपासूनच सुरू केले होते. १८९६ च्या दरम्यान आवटे आणि धामणस्कर यांनी मिळून महाराजांच्या आश्रयाने माधवराव पवार यांच्या घरी मराठा जातीचे पुजारी तयार करण्याचे वर्ग सुरू केले. याच वर्षी बडोद्यातील वेदोक्त प्रकरणास सुरुवात झाली. या पाठशाळांमधून धर्म साक्षरतेचे शिक्षण आणि भगवद्गीतेचे ज्ञान दिले जाई. याही पुढे जाऊन महाराजांनी केलेले धर्म साक्षरतेचे कार्य पाहता महाराजांच्या राज्यकारभारात भारताच्या शेकडो वर्षांत झाले नाहीत असे अनेक क्रांतिकारक निर्णय घेतलेले दिसतात. इतकेच नव्हे तर त्या निर्णयांचा सकारात्मक परिणाम महाराजांना त्यांच्या

हयातीत अनुभवता आला. महाराजांनी आपल्या धार्मिक आणि सामाजिक सुधारणांमध्ये संस्कृत भाषेच्या संवर्धनाला अतिशय महत्व दिले होते.

राजवाड्यात होणाऱ्या धार्मिक विधींचे अर्थ सर्वांना समजावेत या उद्देशाने विधींचे मंत्र अर्थासह प्रकाशित करण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी २३ नोव्हेंबर १८८६ रोजी राजवाड्यात होणारी सर्व धार्मिक कृत्ये शास्त्रार्थासह तपशीलवार लिहून काढण्याचा आदेश दिला. रा. रा. शंकर मोरो रानडे, कृष्णदेव महादेव समर्थ आणि भाऊ मास्तर या तिघांनी सयाजीरावांच्या आज्ञेवरून धर्मविधींचा तपशीलवार शास्त्रार्थ विशद करणारा 'ऐनेराजमेहेल' नावाचा ग्रंथ तयार केला.

१८८७ च्या पहिल्या युरोप दौऱ्यावेळी महाराजांनी दुर्मिळ संस्कृत हस्तलिखिते जमा करण्याच्या सूचना दिल्या. १८९३ मध्ये संस्कृतीचे जतन करण्यासाठी हस्तलिखितांचे संग्रह आणि संपादन करण्याची गरज ओळखून महाराजांनी विद्वानांना पाटणसारख्या ठिकाणी पाठवून पोथ्यांचे अध्ययन आणि अनुवादाचे काम सोपवले. यामध्ये विठ्ठल मंदिरातील संस्कृत हस्तलिखितांचा संग्रह, श्रीमंत संपतराव गायकवाड यांचा ग्रंथसंग्रह, पंडित यज्ञेश्वर शास्त्रींचा हस्तलिखित संग्रह यांचा समावेश झाला. याबरोबरच महाराणी चिमणाबाईंनी खाजगी देवघरातील पाच चित्रांची धातुपट्टी या संग्रहास भेट दिली. यामध्ये महाभारत (लांबी २२८ फूट), भागवत (लांबी ८४ फूट), भगवद्गीता (लांबी १०॥ फूट) आणि हरिवंश (लांबी ४८ फूट) यांचा समावेश होता.

## कृतीशील उपक्रम

महाराजांनी १९१५ मध्ये ‘गायकवाड ओरिएंटल सिरीज’ ही संशोधनमाला सुरू करण्याचा निर्णय घेतला. या मालेत १९१६ मध्ये राजशेखर कृत ‘काव्यमीमांसा’ हा पहिला ग्रंथ प्रसिद्ध झाला. विविध महाकाव्ये, पुराणे, स्मृती, धर्मशास्त्र, काव्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र, छंदशास्त्र अशा अनेक विषयांचे ग्रंथ संग्रहित करण्यात आले. महाराजांच्या आज्ञेवरून अनंतकृष्ण शास्त्री यांनी संपूर्ण भारतभर फिरून सात वर्षांच्या भ्रमंतीतून दहा हजार हस्तलिखिते जमा केली. १९३३ पर्यंत १३ हजार ९८४ हस्तलिखितांचा संग्रह बडोदा प्राच्यविद्या संस्थेकडे उपलब्ध झाला. हा संग्रह भारतातील सर्वोत्तम संग्रहांपैकी एक मानला जातो. यासाठी स्वतंत्र संस्था असावी असे महाराजांचे मत पडले आणि यातूनच १ सप्टेंबर १९२७ साली प्राच्यविद्या संस्थेची स्थापना करण्यात आली.

सुरुवातीस ही संस्था बडोदे येथील मध्यवर्ती वाचनालयाचा एक भाग म्हणून कार्यरत होती पण पुढे तिचा विस्तार होत गेला. १९३१ मध्ये शिक्षण खात्यातील भाषांतर विभाग या संस्थेस संलग्न करण्यात आला आणि सामान्य प्रजेला ज्ञानाचा लाभ मिळावा म्हणून उत्तम ग्रंथांचे स्थानिक भाषेत म्हणजेच गुजराती व मराठीत भाषांतर करण्याचे काम सुरू झाले. १९३२ अखेर महाराजांनी भाषांतर शाखेसाठी दीड लाख रुपये खर्च केले होते. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ४१ कोटी २५ लाख

रु.हून अधिक भरते. ज्ञानाच्या लोकशाहीकरणासाठी महाराजांनी केलेल्या या गुंतवणुकीला आधुनिक भारताच्या इतिहासात तोड नाही. १९४९ ला ही संस्था महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठाशी संलग्न करण्यात आली.

या संस्थेत हस्तलिखितांचा संग्रह, छापील किंवा प्रकाशित पुस्तके, समिक्षित आवृत्ती विभाग, भाषांतर विभाग असे एकूण चार विभाग आहेत. या भाषांतर विभागांतर्गत हिंदूधर्मासोबतच जैन, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन धर्माची पुस्तके मराठी, गुजराती, हिंदीमध्ये भाषांतर करून धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र निधी उभारला. यातूनच "सयाजी साहित्य माला", "सयाजी बाल ज्ञानमाला", "श्री सयाजी ग्रामविकासमाला", इ. ग्रंथमाला सुरु करण्यात आल्या.

## भाषांतर शाखा

१८८८ मध्ये भाषांतर मालेची सुरवात झाली. १८९३ मध्ये संस्थानामार्फत विद्वान लेखक नोकरीस ठेवून ग्रंथ लेखनाचे काम करण्याची व्यवस्था करण्यात आली. मनिलाल द्विवेदी यांनी या योजनेअंतर्गतच पाटण येथील प्रसिद्ध जैन भांडारातील २१ ग्रंथांचे संशोधनात्मक भाषांतर केले होते. हीच भाषांतर शाखेची पहिली सुरुवात होय. याविषयी बोडस म्हणतात, "श्रीमंत महाराजांची स्वारी कडीप्रांती गेली असता पट्टन येथील संस्कृत ग्रंथ संग्रह त्यांचे पाहण्यात आला. ज्यास संस्कृत येत नाही अशा लोकास त्यातील ज्ञानाचा लाभ जरूर व्हावा या हेतूने इतिहास, शास्त्र, नाटक व धर्म

या चार विषयातील उपयुक्त पुस्तके, संस्कृतातून चांगली पुस्तके मराठीत लिहिण्याविषयी हुकुम देण्यात आला.” या भाषांतराच्या कामावर ३०० रु. दरमहाचा एक अधिकारी नेमून २१ ग्रंथ तयार करण्यात आले. ‘नितीकाव्यामृत’, ‘काव्यकल्पकता’ ही पुस्तके प्रकाशित झाली.

महाराजांनी मॅक्स मुल्लरने भाषांतरीत केलेल्या ‘सेक्रेड बुक्स ऑफ दी ईस्ट’ या मालेत प्रकाशित केलेल्या बारा उपनिषदांपैकी सात उपनिषदांचे मराठी अनुवाद करण्याचे काम केळूसकरांवर सोपवले. हे भाषांतर करत असताना केळूसकरांनी मॅक्स मुल्लरच्या ऐवजी मूळ संस्कृत ग्रंथांवरून ते भाषांतर केले. विशेष म्हणजे या अनुवादात केळूसकरांनी मॅक्स मुल्लरचा कोठेही आधार घेतला नाही. फक्त उपनिषदांवरील शांकरभाष्यासाठी मात्र त्यांनी मॅक्स मुल्लरचा आधार घेतला. हे भाषांतरही परीक्षण समितीने उत्कृष्ट ठरवले. संस्कृत ग्रंथांवरून थेट मराठीत असे भाषांतर करणारे केळूसकर हे पहिले ब्राह्मणेत्तर ठरतात. बारा पैकी उरलेल्या सहा उपनिषदांचे भाषांतर शंकर मोरो रानडे यांनी केले.

## संस्कृत ज्ञानाचे उपयोजन

वेदोक्त प्रकरण सुरु करण्यापाठीमागे महाराजांचा हेतू समाजातील उच्चनीचता कमी करून समानता प्रस्थापित करणे हा होता. यासंदर्भात सरदेसाई म्हणतात, “महाराजांच्या हुकुमावरून सर्व सोळा संस्कार विधींचे मराठी भाषांतर करून छापण्याचे काम मी केले; अर्थात हा एक नवीनच धर्म संशोधनाचा लाभ

मला मिळाला. राजवाड्यात होणारे विधी सर्वांचे मूळ अर्थ व हेतू महाराजांनी मजकडून समजून घेतले. त्यासाठी दोन-तीन वर्ष पावेतो मी महाराजांना संस्कृत शिकवीत होतो." एखादा कायदा जनतेसाठी लागू करण्याआधी स्वतः त्याचा अभ्यास करण्याची महाराजांची अभ्यासू वृत्ती यातून दिसून येते.

वर्षानुवर्षे पुराणोक्त पद्धतीने होणाऱ्या धार्मिक कार्याविषयी महाराजांनी माहिती घेऊन त्यासाठी राजारामशास्त्री टोपले यांच्याजवळ गीतापठण करून धार्मिक प्रश्नांवर चर्चाही केली. पुढे ब्राह्मण शास्त्री वेदोक्ताची टाळाटाळ करतात हे पाहून महाराजांनी आप्पासाहेब मोहिते या मराठ्याची खानगी कारभारी म्हणून नियुक्ती केली आणि १८९६ साली दसऱ्याच्या दिवसापासून धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने सुरू केले; परंतु या कार्यास महाराष्ट्रीयन ब्राह्मणांनी नाकारून राजवाड्यावरील भोजनावर बहिष्कार टाकला. त्यांच्याऐवजी गुजराती ब्राह्मण आणि इतर जातीतील अनाथ, दुर्बल लोकांना भोजनास बोलावून अधिक पुण्य, समाधान मिळत असल्याची भूमिका सयाजीरावांनी घेतली आणि गुजराती ब्राह्मणांकडून दसऱ्याचे वेदोक्त विधी करून घेतले.

१९०५ च्या हिंदू विवाह कायद्यात १९२८ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार लग्नविषयक सर्व वैदिक मंत्रांचे मराठी, गुजराती व हिंदी या भाषांमध्ये भाषांतर करून ते सरकारमार्फत प्रसिद्ध करण्यात आले. १९०३ मध्ये सयाजीरावांनी प्रायश्चित्त विधीची

शास्त्रोक्त माहिती देणारा ग्रंथ लिहिण्याचा आदेश भिकाचार्य ऐनापुरे यांना दिला. या आदेशानुसार ऐनापुरे यांनी लिहिलेला 'प्रायश्चित्तमयूख' हा संस्कृत ग्रंथ व त्याचे मराठी भाषांतर १९१४ मध्ये सयाजीरावांनी प्रकाशित केले. १८८८ च्या प्रायश्चित्तानंतर प्रायश्चित्ताबाबत धर्मशास्त्र काय म्हणते हे लोकांना कळावे आणि त्यातून लोकांची धर्माबाबत साक्षरता वाढावी म्हणून प्रकाशित केलेला हा ग्रंथ म्हणजे महाराजांच्या धर्म सुधारणा अभियानाचा उत्तम नमूना आहे.

## क्रांतिकारी कायद्याची निर्मिती

प्रत्येक धर्मामध्ये धार्मिक विधी करणाऱ्या पुरोहितांची एकाधिकारशाही वाढलेली आज आपल्याला पहावयास मिळते. बडोद्यातील धार्मिक क्षेत्रातील अंधाधुंदीचा कारभार थांबण्यासाठी महाराजांनी श्रावणमास दक्षिणेच्या माध्यमातून धर्मसुधारणेस सुरवात केली. परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनाच दक्षिणा देण्याचा नियम सयाजीरावांनी केला. यातून श्रावणमास दक्षिणेवरील खर्चात बचत झाली. या बचतीतून बडोद्यात श्रावणमास दक्षिणा फंडातून दरसाल १०,००० रुपये धर्मशास्त्रावरील पुस्तकांचे भाषांतर करण्यासाठी देण्यात येत असत. याच प्रयत्नांचा पुढील टप्पा म्हणून पुरोहित कायद्याकडे पाहता येईल. हा कायदा १९१५ मध्ये लागू केला असला तरी सयाजीरावांनी १९११ पासून त्या दिशेने वाटचाल सुरू केली होती.

१९११ मध्ये पुरोहित व पुराणिक यांचे धार्मिक ज्ञान तपासणीसाठी परीक्षा घेण्याचा आदेश काढण्यात आला. या हुकुमानुसार १९१२ मध्ये बडोद्यात पहिली परीक्षा घेण्यात आली. या धोरणानुसार २२ मे १९१३ रोजी हिंदू पुरोहित बिल प्रसिद्ध करून त्यावर समाजातील विविध घटकांच्या सूचना मागवण्यात आल्या आणि ३० डिसेंबर १९१५ रोजी बडोदा जिल्ह्यात हा कायदा लागू करण्यात आला. धार्मिक विधी करण्यासाठी योग्य धार्मिक शिक्षण घेतलेले पुरोहित तयार करणे हा या कायद्याचा उद्देश होता. यानुसार हिंदू धर्मातील कोणत्याही जातीतील व्यक्तींना पौरोहित्य प्राप्तीसाठी परीक्षा देण्याचा अधिकार प्राप्त झाला.

प्रथम बडोदा जिल्ह्यापुरता मर्यादित असणाऱ्या या कायद्याच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करून जनतेच्या मानसिक तयारीसाठी १८ वर्षांचा कालावधी देऊन अखेर १९३३ मध्ये संपूर्ण संस्थानात पुरोहित कायदा लागू करण्यात आला. पौरोहित्य करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना हिंदू पुरोहित परीक्षा, याज्ञीक विषयातील किंवा श्रावणमास दक्षिणा परीक्षा यापैकी एक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले. दरवर्षी होणारी परीक्षा उत्तीर्ण होणे पुरोहितांना बंधनकारक ठरले. उत्तीर्ण व्यक्तींना सरकारकडून प्रशस्तीपत्र दिले जाई. परंपरागत व्यवसाय म्हणून कोणालाही पौरोहित्य करता येणार नाही अशी व्यवस्था या कायद्याने केली. पुरोहितांचे धर्मविषयक ज्ञान अद्यावत करण्याबरोबरच

समाजातील सर्व घटकांना हे ज्ञान मातृभाषेत समजावे यासाठी परवानाधारक पुरोहितांना धार्मिक विधींचा शास्त्रार्थ यजमानाला मातृभाषेत समजावून सांगण्याचे बंधनकारक करण्यात आले. तसे न केल्यास २५ रुपये दंडाची तरतूद या कायद्यात करण्यात आली. बहुजन समाजाची धर्मविषयक समज वाढावी हा यामागील प्रमुख उद्देश होता.

## जागतिक फलनिष्पत्ती

सयाजीरावांच्या या धर्मसाक्षरता जिवनव्रताचा सर्वोच्च सन्मान म्हणजे त्यांना देण्यात आलेले १९३३ च्या शिकागो येथील दुसऱ्या जागतिक धर्मपरिषदेचे अध्यक्षपद होय. १८९३ च्या पहिल्या धर्मपरिषदेतील स्वामी विवेकानंदांनी केलेल्या भाषणातून दिलेली विश्वबंधुत्वाची साद भारताने ऐकली. मात्र १९३३ मध्ये त्याच शिकागोत अमेरिकेच्या गार्ड ऑफ ऑनर सलामीसह संपूर्ण जगाने सयाजीरावांना अध्यक्षपदाच्या रूपाने दिलेली मानवंदना भारताला कळली नाही हे आपले दुर्दैवच.

संस्कृत भाषा आणि धार्मिक ज्ञान ही ब्राह्मणांची मक्तेदारी होती. पण कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी या भाषेपासून अनभिज्ञ अशा हिंदू धर्मातील व्यक्तींना संस्कृत भाषेचे ज्ञान देणे गरजेचे होते. संस्कृत शिक्षणाअभावी पुरोहित कायद्यातील तरतुदींचा लाभ घेणे शक्य नव्हते. विशेषतः अस्पृश्य जातींना संस्कृत शिक्षण देण्याची आवश्यकता होती. या कायद्याची पूर्वतयारी म्हणून २ वर्ष आधी १९१३ रोजी अस्पृश्यांसाठी संस्कृत

पाठशाळा सुरू करण्यात आली. पहिल्याच वर्षी या शाळेत २५ विद्यार्थी संस्कृत शिक्षण घेत होते. आधुनिक कालखंडात सयाजीराव हे पहिले राज्यकर्ते आहेत की ज्यांनी अस्पृश्यांना संस्कृत ज्ञानभांडाराची दारे खुली केली. १९१३ साली महाराजांनी अस्पृश्य जातीतील पुरोहितांसाठी गरोडा पाठशाळेची सुरुवात केली. त्यांना दरमहा ८ रु. शिष्यवृती देण्यात येत असे.या पाठशाळेचा अभ्यासक्रम कालावधी ३ वर्षांचा होता.

## संस्कृत भाषेचे लोकशाहीकरण

हिंदूंमधील सर्व जातीच्या लोकांना संस्कृत शिकण्याची संधी उपलब्ध करून देण्यामागील आपली भूमिका व्यक्त करताना १९१५ च्या भाषणात महाराज म्हणतात, "बडोद्यास पूर्वी संस्कृत शाळा होती परंतु तिचा जनसमूहाला व्हावा तसा उपयोग होत नसल्यामुळे ती बंद करावी लागली. आता विद्वान व प्रगल्भ विचाराचे शिक्षक मिळाल्यास ती शाळा पुन्हा सुरू करण्याचा माझा विचार आहे. या शाळेपासून सर्व लहान, थोर वर्गाच्या लोकांना फायदा होईल अशी मला आशा आहे. ओघासच आले म्हणून सांगतो की विद्या व धर्मज्ञान सर्वांचे धन असल्यामुळे ते सर्वांना मिळण्यास अडचण असू नये. हिंदू लोकांना आपला धर्म व त्याची तत्त्वे याविषयी खरी माहिती नाही, असे म्हणण्यास हरकत नाही. ज्यात धर्माचे शिक्षण दिले जात नाही असा सुधारलेला देश कोठेही आढळावयाचा नाही." आपल्या या

भूमिकेच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून महाराजांनी १९१५ रोजी बडोद्यात संस्कृत पाठशाळेची स्थापना केली. हिंदू धर्मातील सर्व जातींना संस्थांनी खर्चाने संस्कृत शिक्षणाची सोय करण्यात आली. बडोद्यातील संस्कृत शाळांमध्ये वेद, व्याकरण, तर्क, धर्मशास्त्र, वेदांत व पुराणे यातील तत्वज्ञानाचे शिक्षण दिले जात होते.

१८८१ मध्ये बडोद्यातील संस्कृत शाळांची संख्या ११ तर विद्यार्थी संख्या २८९ इतकी होती. १९१३ ते १९२५ च्या दरम्यान शाळांची संख्या सरासरी १० ते १५ च्या दरम्यान होती तर विद्यार्थी संख्या ४०० होती. महाराजांनी १९२९ मध्ये 'भारतीय संस्कृती' या विषयाशी संबंधित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी २,००० रुपयांची मदत पॅरिस विद्यापीठाला दिली. आजच्या रूपयाच्या मूल्यात ही रक्कम सुमारे ५० लाख ७६ हजार रु.हून अधिक भरते. यावरुन संस्कृत शिक्षणाची बडोद्यातील व्याप्ती लक्षात येते.

## तुलनात्मक धर्मअभ्यास

१९१६ रोजी सयाजीरावांनी बडोदा कॉलेजमध्ये केंब्रिज विद्यापीठातील विद्वान प्रा. जे. ए. विजेरी यांच्या नेतृत्वाखाली तत्वज्ञान आणि तुलनात्मक धर्म अभ्यासाचे अध्यासन सुरू केले. या अध्यासनात हिंदू, इस्लाम, बौद्ध, ख्रिश्चन आणि जगातील अन्य धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला जात होता.

अशा प्रकारचे भारतातील आजवरचे हे एकमेव अध्यासन आहे. १९१८ मध्ये 'गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी' या तुलनात्मक धर्म अभ्यासाच्या जगातील पहिल्या संशोधन ग्रंथमालेची सुरुवात केली.

धर्माचा तुलनात्मक अभ्यास करताना इतर धर्मीयांना संस्कृत भाषेतील धर्मग्रंथ कळावेत यासाठी महाराजांनी संस्कृत शिक्षण आणि ग्रंथांचे भाषांतर यांच्या माध्यमातून संस्कृत भाषेच्या अभ्यासाला चालना दिली. यामागील महाराजांची दृष्टी वैश्विक मानव कल्याणाची होती. विविध धर्मातील साम्य आणि भेद आपल्याला कळतील आणि स्वधर्म श्रेष्ठत्वाची भावना गळून पडेल, परिणामी परधर्म द्वेषाचे विष कमी होईल आणि संवादाच्या संधी निर्माण होतील हे महाराजांचे धर्मचिंतन त्या कालखंडपेक्षा आजच्या कालखंडात जास्त आवश्यक आहे. हाच विचार संस्कृत साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात मांडताना महाराज म्हणतात, "पाश्चिमात्य लोकांप्रमाणे तुलनात्मक व विवेचक पद्धतीने आपण भाषेचे व तिच्याद्वारे समजणाऱ्या विषयांचे अध्ययन केले पाहिजे. आपली संस्कृती व पाश्चिमात्य संस्कृती या दोहोंमधील सुंदर व संग्राह्य गोष्टींचे मधुर संमेलन आपण केले पाहिजे आणि पूर्व ती पूर्व व पश्चिम ती पश्चिम; या दोघींचा मिलाफ कधीही होणार नाही. हे वचन जे नेहमी कानावर पडते ते खोटे पाडले पाहिजे."

## भांडारकर प्राच्यविद्या संस्थेला पाठबळ

पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या मंदिराच्या स्थापनेसाठी एक हजार रुपयांची आर्थिक मदत महाराजांनी केली होती. १९१६ ते १९४० पर्यंत २४ वर्षे ५०० रुपये वर्षासन आणि १९२२ मध्ये महाभारतावरील संशोधनासाठी ५,५०० रुपये दिले गेले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ४ कोटी ५८ लाख ६२ हजार रु.हून अधिक भरते. परंतु भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचे आश्रयदाते असणाऱ्या सयाजीरावांचा फोटोसुद्धा आपल्याला तेथे पहावयास मिळत नाही. महाराजांनी रामायण आणि महाभारत यासाठी दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली. या रकमेच्या व्याजातून प्रादेशिक भाषेच्या उत्तेजनार्थ अनेक संस्कृत ग्रंथांचे मराठीत भाषांतर करण्यात आले. महाराज म्हणत, "उपनिषदे, भगवद्गीता व ब्रह्मसूत्रे या प्रस्थानत्रयीने संस्कृत विद्येचे वैभव शिखरावर पोहोचलेले आहे. महाभारत व रामायण या दोन महाकाव्यापैकी महाभारत हा ग्रंथ तर इतका पूज्य मानण्यात येतो की त्याला पाचवा वेदच म्हणतात." महाराजांनी धर्म अभ्यास आणि संस्कृत भाषेचा अभ्यास यासाठी जेवढे कष्ट उपसले होते तेवढे आधुनिक भारतातील आजअखेर एकाही प्रशासकाने उपसले नाहीत.

सयाजीरावांनी आपली प्रजा ज्ञानसंपन्न व्हावी यासाठी अविरत प्रयत्न केले. त्याचप्रमाणे स्वत:ही वेगवेगळ्या क्षेत्रात पारंगत होण्याचा ध्यास जोपासला होता. श्रीमत्स्वामी हंसस्वरूप

यांची सनातन वैदिक धर्मावरील दहा व्याख्याने सनातन मंडळींनी बडोद्यामध्ये आयोजित केली होती. महाराजांच्या कानावर या व्याख्यानांच्या कौतुकपूर्ण चर्चा येऊ लागल्या. परंपरावादी हिंदू धर्माचा पुरस्कार करणार्या या व्याख्यानांचे आयोजन महाराजांनी राजवाड्यात केले.

स्वामी हंसस्वरूपांचा टोकाचा हिंदू धर्म अभिमान विज्ञानवादी महाराजांना पटला नाही. या व्याख्यान मालिकेनंतर महाराजांनी केलेल्या समारोपाच्या भाषणात या व्याख्यानांवर उत्स्फूर्तपणे आक्षेप नोंदवत प्रतिवाद करणारे दोन तासाचे भाषण करून हंसस्वरूप स्वामींचे सर्व मुद्दे खोडून काढत त्यांना माफी मागण्यास भाग पाडले. माफी मागताना हंसस्वरूप म्हणाले, “महाराज आपल म्हणणं मला मान्य आहे. आपल्याला विरोध करण्याची माझ्यासारख्याची योग्यता नाही.” हंसस्वरूप सामान्य आसामी नव्हती. ती संपूर्ण भारतवर्षातील हिंदूधर्माची भाष्यकार होती. यावरून महाराजांची धर्मचिकित्सा आणि त्यासाठी लागणाऱ्या संस्कृत भाषाज्ञानाच्या व्यासंगाचे दर्शन घडते.

## संस्कृत संवर्धनामागील वैज्ञानिक भूमिका

५ मार्च १९१५ रोजी बडोदा येथे भरलेल्या पहिल्या संस्कृत संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीही महाराज स्वत: हजर होते. दुसऱ्या दिवशी महाराजांनी या संमेलनात भाषण केले. यावरून महाराजांची भाषा, साहित्य, संस्कृती आणि एकूणच ज्ञान व्यवहाराबाबतची आसक्ती प्रतीत होते. यावेळी संमेलनाला

मार्गदर्शन करताना महाराज म्हणतात, “संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन येथे व्हावे या उद्देशाने प्रस्तुतचे संमेलन भरवण्यात आले आहे. प्रजेला कल्याणप्रद होतील अशा ज्याकाही सूचना, ठराव वगैरे हे संमेलन करील, त्यांचा मी अगत्यपूर्वक विचार करेन, धार्मिक आणि सामाजिक सुधारणा करावयाच्या त्या एकट्या दुकट्या राजाच्या एकहाती प्रयत्नाने होत नसतात त्या कामी राजाला धर्मगुरूंचे व लोकांचेही साहाय्य व सहानुभूती मिळाली पाहिजे.” महाराजांच्या या विचारातून एक बाब स्पष्ट होते ती अशी की, महाराजांचे संस्कृत भाषेचे प्रेम हे परंपरेच्या कर्मठ अभिमानातून आलेले नव्हते.

कर्मठ समाजाला कर्मकांडांच्या डबक्यातून बाहेर काढण्यासाठी हजारो वर्षांच्या धर्म संस्कृतीच्या प्रवाहात उत्पन्न झालेली ही कर्मकांडे अभ्यासणे, त्यातील फोलपणा लोकांच्या लक्षात आणून देणे, लोकांना कालबाह्य गोष्टींचा त्याग करण्याची सहज प्रेरणा मिळावी यासाठी प्रयत्न करणे अशा विशाल आणि विज्ञानवादी न्यायाने महाराज संस्कृत भाषेच्या पुनुरूज्जीवनाचा विचार करत होते. संस्कृत भाषेचा एवढ्या व्यापक दृष्टीकोणातून विचार करणारा, परंपरेच्या जोखंडातून भारतीय समाजाला मुक्त करण्यासाठी सकारात्मक ‘भाषा संवर्धन’ असे अभिनव अभियान महाराजांनी आयुष्यभर राबवले. संस्कृत भाषेला नाकारून ‘नकारात्मक’ परंपरा ‘सकारात्मक’ होत नसते. या भूमिकेतून महाराजांनी केलेले ‘प्रबोधन प्रयत्न’ वेळीच भारतीय प्रबोधन

परंपरेच्या केंद्रस्थानी आले असते तर भारतात प्रबोधनाचे खरे 'सुवर्ण युग' अवतरले असते. आजच्या भारतात प्रबोधनाच्या क्षेत्रात निर्माण झालेली प्रचंड कोंडी तसेच प्रागतिक विचाराची घुसमट विचारात घेता महाराजांचा हा दृष्टीकोण आजच्या आपल्या कोंडीवरचा ठोस 'उतारा' आहे.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

<u>मराठी :</u>

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

<u>हिन्दी :</u>

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्रऱ युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

● महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथगार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.

● सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१८४६६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com